# पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना

**: अहवाल :**

**◈ २००६ - २००७ ◈**

---

## • नारायणपूर येथील विद्यापीठस्तरीय शिबिर :

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २५ एप्रिल ते ०४ मे २००६ दरम्यान नैसर्गिक शेती व सी.सी.टी. प्रशिक्षण या विषयावर विद्यापीठ स्तरीय शिबिर पार पडले.

नारायणपूर येथील शिबिरात पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्हयांतून रासेयो स्वयसेंवकांनी सहभाग नोंदविला. या शिबिरामध्ये नैसर्गिक शेती व सी.सी.टी. प्रशिक्षण हे प्रमुख उद्‌देश ठेवण्यात आले. श्री. टाकळकर यांनी स्वयंसेवकांना सी.सी.टी. चे प्रशिक्षण दिले व सौ संजीवनी जोगळेकर यांनी स्वयंसेवकांना नैसर्गिक शेती संदर्भात मार्गदर्शन केले.

## • देवगड येथील नैसर्गिक शेती प्रशिक्षण शिबिर :

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत देवगड, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथे दिनांक ८ व ९ एप्रिल २००६ दरम्यान '**नैसर्गिक शेती**' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर प्रामुख्याने पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिका–यांसाठी ठेवण्यात आले होते. या शिबिरामध्ये नैसर्गिक शेती कशी करावी, नैसर्गिक शेतीचे फायदे, स्वयंसेवी संस्थेची स्थापना कशी करावी अशा अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रा.निलुफर अहमद, राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मुंबई, कॅप्टन सुभाष चंद, प्रा.एम.एस.जाधव, वित्त व लेखा अधिकारी, पुणे विद्यापीठ, डॉ. संभाजी पठारे, संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, डॉ. संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना उपस्थित होते

## • बैंगलोर येथील आदानप्रदान कार्यक्रम :

दि. ३० एप्रिल ते ७ मे २००६ या दरम्यान बैंगलोर येथे आदान प्रदानाचा कार्यक्रम पार पडला. रासेयो क्षेत्रिय कार्यालयाचे मा.डॉ.एच.एस.सुरेश यांनी १० रासंयो स्वयंसेविका, दोन प्राध्यापक व कार्यक्रम समन्वयक यांना दि. ३० एप्रिल ते ७ मे २००६ दरम्यान बैंगलोर येथे अंमत्रित केले होते. या शिबिरासाठी १० विविध राज्यांमधून मुली सहभागी होऊन त्यांनी संस्कृती आदान प्रदान, भाषा संस्कृती, राष्ट्रीय एकात्मता, उपक्रमशिलता, उद्यम विकास अशा विविध पैलुवर आदान प्रदान करण्यात आले.

.

## • राष्ट्रीय एकात्मता शिबिर :

दि. २९ मे ते ०४ जून २००६ दरम्यान पुणे विद्यापीठ आवारात राष्ट्रीय एकात्मता शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन राष्ट्रीय युवा योजना यांच्या प्रकल्पाअंतर्गत मा.सुब्बाराव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित आले. यासाठी भारत भरातून ६५० विद्यार्थी पुणे विद्यापीठात या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी सहभागी झाले होते.

या ६५० स्वयंसेवकांसाठी खालीलप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या आवारात उपक्रम राबविण्यात आले.

१. हत्तीखाना जवळील तलावाच्या पलीकडील टेकडीवर १५०० मीटर लांबीचे सलग समपातळी चर घेतले.
२. आपत्ती व्यवस्थापन
३. वृक्षारोपण
४. एडस् अवेरनेस
५. आंतरभारती
६. व्यक्तीमत्व विकास

इ. सर्व उपक्रम राष्ट्रीय एकात्मता शिबिरात राबविण्यात आले.

## • रासेयो एकक मान्यता:

रासेयो उच्च व तंत्र विभाग महाराष्ट्र राज्य यांनी पुणे विद्यापीठास ३३,००० एवढी विद्यार्थी संख्या दिलेली आहे. त्याप्रमाणे २०२ महाविद्यालयांना ५०, १००, १५०, २००, २५० अशा प्रकारे एककाचे वाटप करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय संख्या | एकूण स्वयंसेवक संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ५१ | ८४५० |
| २ | पुणे ग्रामीण | ३६ | ६५०० |
| ३ | अहमदनगर | ५७ | ९३५० |
| ४ | नाशिक | ५९ | ८७०० |
| | एकूण | २०३ | ३३,००० |

- **पुणे ते पंढरपूर वृक्षदिंडी व स्वच्छता अभियान :**

दि. १८ जून ते ०७ जुलै २००६ दरम्यान पुणे ते पंढरपूर वृक्षदिंडी व स्वच्छता अभियान रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे विद्यापीठ, पुणे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा.श्रीमती निलुफर अहमद, राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.श्री. रत्नाकर गायकवाड, पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय चाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. दि. २१ जून २००६ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.श्री. रत्नाकर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पुणे ते पंढरपूर वृक्षदिंडीचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रा.श्रीमती निलुफर अहमद, राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सचे विभागप्रमुख मा. खलील अहमद, पुणे विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी प्रा. एम.एस.जाधव, पुणे विद्यापीठ, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक मा.डॉ. संभाजी पठारे, पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय चाकणे या कार्यक्रमादरम्यान उपस्थित होते.

दि. १८ जून ते ०७ जुलै २००६ दरम्यान चाललेल्या पुणे ते पंढरपूर वृक्षदिंडी व स्वच्छता अभियानात राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकुण ७० स्वयंसेवकांनी व १० प्राध्यापकांनी मोठया प्रमाणावर या दिंडीत जनजागृती, वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहिमेबद्दल वारक—यांना व इतर भाविकांना माहिती दिली.

या राष्ट्रीय सेवा योजेनेच्या स्वयंसेवकांनी पुणे ते सासवड मार्गावरील दिवेघाट, वडकीनाला, जेजुरी, दौंडज येथील टेकडीवर एकुण २०,००० हजार रोपांचे वृक्षारोपण आणि ५०,००० हजार शेवग्याच्या बियांचे बिजारोपण करण्यात आले. त्याचबरोबर पुणे ते पंढरपूर दिंडीत सहभागी झालेल्या वारक—यांना शेवग्याच्या आणि तुळशीच्या बियाचे वाटप करण्यात आल्या.

प्रत्येक पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पालखी तळाची स्वच्छता केली. तसेच ठिकठिकाणी गर्दीच्या ठिकाणी रासेयो स्वयंसेवकांनी पोलिसमित्र म्हणूनही काम केले. त्याचबरोबर या रासेयो स्वयंसेवकांनी वृक्षारोपण आणि स्वच्छता माहिमेबरोबर समाजात जनजागृती व्हावी या द्ष्टीने वारक—यांच्या प्रत्यक्ष भेटी घेवून त्यांना विजेची बचत कशी करता येईल, अक्षय प्रकाश योजनेची माहिती, नैसर्गिक शेतीचे फायदे काय आहेत, स्वच्छता मोहिम कशी करता येईल, झाडे लावा व झाडे जगवा इत्यादी सर्व उपक्रमाविषयी विस्तृत अशी माहिती रासेयो स्वयंसेवकांनी या लोकांमधून घडवून आणून समाजात जनजागृती केली.

या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे समाजाविषयी असलेली आस्था आणि तळमळता बघून अनेक मोठमोठया आधिका—यांनी या वृक्षदिंडीला भेट देवून या रासेयो स्वयंसेवकांचे मनापासून कौतूक केले. एवढेच नाही तर या वारक—यांमधून अनेक लोकांना या रासेयो स्वयंसेवकांचे मनापासून कौतूक करुन त्याच्या मनात असलेल्या समाजाविषयी असलेली जाण आणि तळमळता, माणुसकीचे कौतूक या वारक—यांनी केले.

एकुण २० दिवस चाललेल्या या वृक्षदिंडीचा समारोप शुक्रवार दि. ७/०७/२००६ रोजी आषाढी एकादशी दिवशी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.इरेश स्वामी यांच्या

अध्यक्षतेखाली आणि रासेयो, कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या राज्यसंपर्क अधिकारी मा. श्रीमती निलुफर अहमद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या समारोप प्रसंगी पुणे विद्यापीठाचे वित्त लेखा अधिकारी प्रा.एम.एस.जाधव, पुणे विद्यापीठ, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे, पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय चाकणे, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सचे विभागप्रमुख प्रा.खलील अहमद, कोल्हापूर विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक प्रा.संजय ठिगळे, सोलापूर विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. तुकाराम शिंदे, भारती विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक प्रा.के.व्ही.मोहिते या समारोप कार्यक्रमादरम्यान उपस्थित होते.

- **दिल्ली येथील कार्यक्रम समन्वयक बैठक :**

भारतातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयंकाची एकत्रित सभा दिल्ली येथे विज्ञान भवन मुख्य सभागृहात दि. २६ व २७ जून २००६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या सभेचे उद्‌घाटन उपराष्ट्रपती मा.भैरवसिंग शेखावत यांच्या हस्ते झाले. या सभेसाठी मा. डॉ. संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, पुणे विद्यापीठ हे उपस्थित होते.

- **राष्ट्रीय सेवा योजना मार्गदर्शिका पुस्तिकेचे प्रकाशन :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना अधिक गतिमान करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना मार्गदर्शिका पुतिस्केची उद्‌घाटन दि. ०५ जुलै २००६ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. रत्नाकर गायकवाड यांच्या हस्ते अहमदनगर उपकेंद्रात झाले.

- **जिल्हानिहाय बैठका :**

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या २००६ – २००७ या वर्षाच्या नियोजनासाठी जिल्हानिहाय बैठका खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आले होत्या.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | २१ जुलै २००६ | स. १०.०० वा | अहमदनगर उपकेंद्र |
| २ | नाशिक | २८ जुलै २००६ | स. ११.०० वा | नाशिक उपकेंद्र |
| ३ | पुणे (शहर आणि ग्रामीण) | ३१ जुलै २००६ | स. १०.०० वा | ज्ञानेश्वर सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे |

या जिल्हानिहाय बैठकीमध्ये प्रामुख्याने प्रत्येक जिल्हयातील महाविद्यालयाला राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक वाटपाचे पत्र, कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्र देण्यात आले. त्याचप्रमाणे बैठकीच्यावेळी रासेयो डायरी, बॅजेस, रासेयो कक्ष, मुंबई यांनी पाठविलेले जॅकेटस्, प्रत्येकी २५ स्वच्छता दुत पुस्तिका, रासेयो मार्गदर्शिका पुस्तिका इत्यादी देण्यात आले.

- **'शिवराय–फुले–शाहु–आंबेडकर' विचार परिषद :**

पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ आणि महात्मा फुले अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ व २३ जुलै २००६ रोजी विद्यार्थ्यांसाठी विचार परिषद संपन्न झाली. या विचार परिषदेचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. रत्नाकर गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे.

**सहभागी महाविद्यालये :–**

| | |
|---|---|
| पुणे शहर | ३७ |
| पुणे ग्रामीण | २६ |
| अहमदनगर | ३२ |
| नाशिक | २८ |

**शोधनिबंध विषयाचे नांव** :

१. महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे आद्य पुरुष शाहु आणि आजचे शिक्षण
२. गुणवत्तेचा सर्वांगीण विकास आरक्षणानेच शक्य आहे.
३. शेतक–यांचा आसूड ते शेतक–यांच्या आत्महत्या

४. सावित्रीबाईंचा शिक्षण विचार आणि आजचे स्त्रीशिक्षण
५. शिवरायांचे नेतृत्व कौशल्य आणि त्यांनी सामान्यजनातून घडवलेले नेतृत्व
६. रयतेचा जाहीरनामा अर्थात शिवरायांचे आज्ञापत्र
७. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान
८. धम्म दीक्षेची ५० वर्ष – समाजपरिवर्तनाची झेप

या परिषदेमध्ये खालील वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

**उद्घाटन समारंभ** :

**शुभहस्ते** – मा. रत्नाकरजी गायकवाड, भा.प्र.से
कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे

**उद्घाटन** : ज्ञानाचे प्रतिके असलेल्या बोधीवृक्षाचे रोपण करुन मा.कुलगुरु यांचे हस्ते झाले.

अध्यक्ष – प्रा. विलास वाघ
प्रास्ताविक – प्रा. हरी नरके
आभार – डॉ. संभाजी पठारे
सुत्रसंचालन – डॉ. संजय चाकणे

**प्रथम सत्र** – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
वक्ते – प्रा.विजय खरे
अध्यक्ष – प्रा. विलास वाघ

**द्वितीय सत्र** – श्री. शाहु महाराज
वक्ते – प्रा. हरी नरके
अध्यक्ष – डॉ. संभाजी पठारे

**तृतीय सत्र** – महात्मा जोतिराव फुले
वक्ते – प्रा. हरी नरके
अध्यक्ष – डॉ. विद्युत भागवत

**चतुर्थ सत्र** – छत्रपती शिवाजी महाराज
वक्ते – डॉ. राजा दीक्षित
अध्यक्ष – डॉ. अरुण अडसूळ

**समारोप समारंभ :—**

पारितोषिक वितरण हस्ते प्राचार्य, डॉ. अरुण अडसूळ

प्रमुख अतिथी — प्रा.एम.एस.जाधव

परीक्षक (समालोचन) — प्रा. गणेश राऊत

सुत्रसंचालन — डॉ. संजय चाकणे.

**परीक्षक** — प्रा. गणेश राऊत
डॉ. शर्मिला रेगे
प्रा. हर्ष जगझाप
प्रा. संजीव सोनवणे
डॉ. धनंजय लोखंडे
डॉ. प्रभाकर घोडके

आलेल्या ११० शोधनिबंधांमधून ४० शोधनिबंधांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. या निबंधांपैकी परिक्षकांनी खालील विद्यार्थ्यांची परितोषिकासाठी निवड केली.

| | | | |
|---|---|---|---|
| **पुणे शहर** | : | प्रथम — | सोनवणे सुरज |
| | | द्वितीय — | गणेश करे पाटील |
| **पुणे ग्रामीण** | : | प्रथम — | कु. लोंढे मयुरी |
| | | द्वितीय — | भोसले श्रीराम |
| **अहमदनगर** | | प्रथम — | कांबळे संदीप |
| | | द्वितीय — | कु. खेडकर वैशाली |
| **नाशिक** | : | प्रथम — | शेळके सरिता |
| | | द्वितीय — | लहानगे आशा |

या शोधनिबंधाचे पुस्तकरुपाने प्रकाशन करण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना यानिमित्ताने १) बुध्द आणि त्यांचा (डॉ.बाबसाहेब आंबेडकर) २) शेतक—याचा असूड (महात्मा फुले) ३) शिवचरित्र (दि.वि.काळे) ४) राजर्षी शाहु महाराज आणि वेदोक्त प्रकरण (उत्तम कांबळे) हे चार ग्रंथ भेट देण्यात आले.

शनिवार दि. २२/०७/२००६ रोजी सायं ६ ते ८ या वेळात सहभागी विद्यार्थ्यांनी व्हिजन २०२० पाच गटात सविस्तर आणि उत्साहवर्धक चर्चा केली. रविवार दि. २३ जुलै

२००६ रोजी सकाळी गटचर्चांचे अहवाल वाचन झाले. याप्रसंगी डॉ. संभाजी पठारे यांनी व्हिजन २०२० बाबत सादरीकरण केले.

- **आपत्ती व्यवस्थापन कक्ष :**

पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने मागील काही वर्षात आपत्ती व्यवस्थापनामध्ये अत्यंत भरीव कामगिरी केली आहे. यशदा येथे १०५ रासेयो कार्यक्रम अधिकारी, विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक, कार्यक्रम समन्वयक यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रत्येकी तीन दिवसांचे प्रशिक्षण घेतले आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा प्रत्येक जिल्हयाच्या (पुणे, अहमदनगर, नाशिक) कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. ६००० स्वयंसेवकांना २८ विविध कार्यशाळांमधून प्रशिक्षित करण्यात आले असून प्रत्येक महाविद्यालयात ३० स्वयंसेवकांचा एक चमू आपत्ती व्यवस्थापनासाठी सिध्द ठेवण्यात आला आहे. बारामती येथे महाराष्ट्रातील १२०० कार्यक्रम अधिका—यांचे 'आपत्ती व्यवस्थापनावरील आधरीत अधिवेशनही घेण्यात आले आहे. 'यशदा' या संस्थेत प्रशिक्षित झाल्यामुळेच मागील पूराच्या वेळेस स्वयंसेवकांनी स्वयंस्फूतीने दापोडी, बोपोडी, सांगवी, येरवडा, हडपसर या भागात अतिशय चांगले काम केले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठामध्ये आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. 'यशदा' येथील आपत्ती व्यवस्थापन कक्षाबरोबर पुणे विद्यापीठाने सामंजस्य करार केला असुन, आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या संचालक पदी डॉ.संजय चाकणे यांची नियुक्ती केली आहे.

या आपत्तीव्यवस्थापन कक्षामार्फत खालील उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

१. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनात प्रशिक्षित करणे.

२. प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थामधून आपत्ती कक्ष स्थापन करणे.

३. BOS – Disaster Mgt. व BOS Community Empowerment यांच्या मदतीने प्रमाणपत्र अभ्यासक्रम पदविका अभ्यासक्रम इ. तयार करणे व पदव्युत्तर

विभागासाठी हे कोर्स राबविणे. तसेच दुरशिक्षणाद्वारे (Distance Education) हे उपक्रम राबविणे.

४. विद्यापीठातील विविध पदव्युत्त्र विभागांना आपत्ती व्यवस्थापन प्रक्रियेत समाविष्ठ करुन घेणे.
५. विविध गावांचा PRA ( Participatory Rural Appraisal ) द्वारा सर्वेक्षण करणे.
६. जिल्हावार कार्यशाळा आयोजित करणे.
७. विद्यापीठ/राज्य/राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र / कार्यशाळा/ परिषदांचे आयोजन करणे.
८. 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर आधारीत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे.
९. 'आपत्ती व्यवस्थापनामध्ये काम करणा–या संस्थांबरोबर कार्य करणे उदा. यशदा, भारतीय जैन संघटना, आरोग्य सेना, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, रेड क्रॉस इत्यादी.
१०. आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माहितीची वेबसाईट तयार करणे.

- **चकाचक अभियान व गांडूळखत प्रकल्प प्रशिक्षण :**

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, पुणे महानगरपालिका व वसुंधरेची प्रेरणा यांचे सयुक्त विद्यामाने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचेसाठी दि. ५ ऑगस्ट २००६ रोजी एक दिवसीय कार्यशाळा पुणे विद्यापीठात संपन्न झाली या कार्यशाळेसाठी ७० महाविद्यालयांमधुन २०० पेक्षा जास्त प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी उपस्थित होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन मा. मोहन अडतानी, मा.डॉ. परदेशी, ॲड. वंदनाताई चव्हाण, डॉ. पाडळे, सौ.संजीवनी जोगळेकर, श्रीमती मंजु तडवळकर इत्यादी उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये खालील गोष्टी ठरविण्यात आल्या.

१. दि. १४ ऑगस्ट रोजी महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियान अर्थात चकाचक मोहिम राबविण्यात येईल.

२. महानगरपालिका यासाठी सर्वतोपरी मदत करणार आहे.

३. राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी असे ५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होतील.

४. गांडूळ खत प्रकल्प ७० महाविद्यालयातून राबविण्यात येईल (Zero Garbage)

- **चकाचक अभियान अंतर्गत जिल्हानिहाय स्वच्छता अभियान :**

पुणे महानगरपालिका ' चकाचक' या मोहिमेद्वारे दि. १४ ऑगस्ट २००६ रोजी पुणे, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक या जिल्हयांमधून स्वच्छता अभियानाचे काम अतिशय चांगल्या रितीने पार पडले.

या अभियानात खालीलप्रमाणे उद्देश ठरविण्यात आले.

१. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या 'चकाचक' टोळया निर्माण करणे.

२. प्रत्येक महाविद्यालयात ओला कचरा निवारण्यासाठी गांडूळ शेती प्रकल्प तयार करणे.

३. दि. १४ ऑगस्ट २००६ रोजी पुणे महानगरपालिका वॉर्डनिहाय प्रत्यक्ष स्वच्छता मोहिम.

४. घरोघरी जाऊन ओला व सुका (घन) कचरा विल्हेवाट जागृती.

५. EM Solution वापराविषयी सूचना

६. मोहिमेविषयी लोकांमध्ये जनजागृती

७. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयीचे महत्त्व.

८. समाजाप्रती मी काही देणं लागतो याची जागृती.

९. व्यक्तीमत्व विकास

१०. आरोग्यविषयक बाबींची जाणीव

- **लिंगसमभाव व लैंगिकतेच्या मुद्यांवर प्रशिक्षण शिबिर :**

स्त्री–पुरूष नातेसंबंध, पुरूषत्व, स्त्रियांवरील हिंसा व संबंधित मुद्यांवर तरूण मुलांमध्ये जागरूकता–संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व मावा या संस्थेने निवडक सहा महाविद्यालयातील रासेया स्वयंसेवकांसाठी लिंगसमभाव व लैंगिकतेच्या मुद्यांवर प्रशिक्षण शिबिर दि. १९ ते २३ ऑगस्ट २००६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन रासेया कार्यक्रम समन्वयक डॉ.संजय चाकणे यांच्या हस्ते करण्यात आले.

लिंगसमभाव, लिंगभाव सरचना, लिंगभाव व विकास, लिंगभाव विषयक साचेबध्द धारणा, लिंगभेद व हिंसा स्वरूप व व्याप्ती या विषयावर श्री. हरीश सदानी, प्रा.रवींद्र यांची दि.१९ ऑगस्ट रोजी व्याख्याने झाली व या विषयांवर मुक्त चर्चा करण्यात आली.

दि. २० ऑगस्ट २००६ रोजी लैंगिकतेची व्याप्ती, पुरूष व स्त्री लैंगिकता, संरचना, लैंगिक व प्रजननविषयक माहिती, देह प्रतिमा व पुरूषत्व या विषयांवर डॉ.अनंत साठे व डॉ.शांता साठे यांची व्याख्याने झाली व स्वयंसेवकांशी या मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

दि.२१ ऑगस्ट २००६ रोजी लैंगिक आरोग्य, लैंगिक अवयवांची निगा, पुरूषांचे आरोग्य विषयक प्रश्न, लैंगिकदृष्टया संक्रमित होणारे आजार या विषयांवर डॉ.अनंत साठे व डॉ.शांता साठे यांची व्याख्याने झाली व स्वयंसेवकांशी या मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

दि. २२ ऑगस्ट २००६ रोजी एचआव्ही/एड्स मूलभूत बाबी, प्रतिबंध, उपचार, निगा व काळजी, हक्क, समानता व समता, लैंगिक हक्क व मूल्ये या विषयांबर डॉ.गीता भावे, डॉ. अर्चना मोरे यांची व्याख्याने झाली

दि. २३ ऑगस्ट २००६ रोजी राग व इतर भावनांवर नियंत्रण, पुयष–सक्षमीकरण, आत्मसन्मान व काळजी या विषयावर डॉ.हरीश शेट्टी, मानसोपचार तज्ञ यांचे व्याख्यान झाले व या विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच स्वयंसेबकांना या विविध विषयांवर आधारित

- **विद्यापीठस्तरीय शिबिर :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि स.म.भा.सं. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. दि. १७ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २००६ या दरम्यान पार पडले. या विद्यापीठस्तरीय शिबिराचे उद्घाटन जलसंधारण विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष विजयअण्णा बो–हाडे यांच्या हस्ते झाले. तसेच या शिबिरासाठी पुणे विद्यापीठाचे रासेयो कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय चाकणे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे, वित्त व लेखा अधिकारी प्रा. एम.एस.जाधव, मा. डॉ. सुधीर तांबे, मा.वसंत टाकळकर, मा. मोहन व्ही.के., मा. विकास पाटील, स.म.भा.सं. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य मा. सहदेव चौधरी उपस्थित होते. या विद्यापीठस्तरीय शिबिरासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयातील महाविद्यालयातून एकुण १४० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

या दि. १७ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २००६ या दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी **सायखिंडी, पिंपळगांव कोझिंरा, चंदनापूरी, चंदनापूरी घाटात, सुकेवाडी (खांजापूर)** या गावातील प्रत्येक डोंगरावर, टेकडीवर स्वयंसेवकांनी सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दुपारी ४.०० वाजेपर्यत नित्यनियमाने :

१) बिजारोपण

२) वृक्षारोपण (स्टॅम्पस् लागवड)

३) सी.सी.टी. पुन:र्भरण

४) सी.सी.टी. चर खोदणे

५) नैसर्गिक शेती

इत्यादी वरीलप्रमाणे सर्व कामे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रत्येक दिवशी एक गांव निवडून त्यागावी सुविधा करुन दिलेल्या ट्रकमध्ये जाऊन सर्व कामे पार पडली. यामध्ये या विद्यापीठस्तरीय शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्याखेरीज सहकार महर्षी

भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेमर या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सुध्दा या दंडकारण्य अभियानात सहभाग नोंदविला.

व्याख्यानामध्ये प्रामुख्याने :

१) मा. वसंत टाकळकर

२) प्रा. तुळशीराम जाधव

३) डॉ. सुधीर तांबे

४) पथनाटय (स्वयंप्रेरित – सामाजिक विकास संस्था)

५) मा. एम.कानवडे, संचालक, संगमनेर सहकारी कारखाना, संगमनेर

६) मा. फादर रॉबर्ट, कार्यक्रम समन्वयक, सर्वांगीण विकास कार्यक्रम

७) मा.गणपतराव सांगळे, सभापती, स.क.समिती, जि.प.अहमदनगर

इत्यादी सर्व मान्यवरांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली.

## समारोप समारंभ :–

दि. २६ ऑगस्ट २००६ रोजी या विद्यापीठस्तरीय शिबिराची सांगता झाली. या समारोप समारंभासाठी एक कोटी झाडे लावण्याचा संकल्प केलेले मा.सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात हे अध्यक्षस्थानी होते. झाड लावणारा माणूस या कथेतून मला या दंडकारण्याची संकल्पना सूचली असे प्रतिपादन केले. आणि खरंच या दंडकारण्य या अभियानाचा दुसरा टप्पा या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पुर्ण केल्याबद्दल आणि मोठया प्रमाणावर वृक्षारापेण आणि बिजारोपण केल्याबद्दल स्वयंसेवकांनी या कामाबद्दल शुभेच्छा दिल्या. या समारोप समारंभासाठी मा.बाळासाहेब थोरात, मा.विवेक सावंत, मा.हरीभाऊ वर्पे, अशोकराव मोरे, मा.माधवराव कानवडे, मा.रावसाहेब कसबे इ. सर्व या समारोप कार्यक्रमासाठी उपस्थित होते. शेवटी स्वयंसेवकांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करतांना आमच्या हातून एक चांगले सामाजिक कार्य पार पडले आणि या विद्यापीठस्तरीय

शिबिरामार्फत आम्हांला या दंडकारण्य अभियानात सामील होता आले या बद्दल पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचे आभार मानले.

- **केमिकल सेफ्टी कार्यशाळा: (दि. १७ ऑगस्ट २००६) :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'केमिकल सेफ्टी ( Chemical Safety) हे एक दिवसीय कार्यशाळा दि. १७ ऑगस्ट २००६ रोजी घेण्यात आले. या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. व्ही.बी.गायकवाड, पुणे विद्यापीठाचे विज्ञान शाखेचे अधिष्ठाता यांनी केले.

या कार्यशाळेमध्ये रसायशास्त्र प्रयोगशाळा कशी असावी? भोपाळ दुघर्टना, केमिकल आपत्ती कशी टाळावी, विद्यार्थ्यांचे प्रबोधन कसे करावे इत्यादी विषयावर डॉ. संभाजी पठारे, डॉ. सुभाष पाध्ये, डॉ. साठये डॉ. व्ही.डी.केळकर यांची व्याख्याने झाली.

या कार्यशाळेचे आयोजन आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संचालक डॉ. संजय चाकणे व यशदा येथील डॉ. अमितकुमार यांनी केले. या कार्यशाळेसाठी ८० महाविद्यालयांमधून ९५ प्राध्यापक, विद्यार्थी व इतर व्यक्ती उपस्थित होत्या.

- **स्वित्झरर्लंड येथील आपत्ती व्यवस्थापन परिषद :**

देवास,स्वित्झरर्लंड येथे झालेल्या आपत्ती व्यवस्थापन परिषदेसाठी डॉ.संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ हे दि. २४ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २००६ दरम्यान उपस्थित राहिले.

या परिषदेमध्ये पुणे विद्यापीठाच्या वतीने त्यांनी आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवकाचा सहभाग या विषयावर त्यांनी आपले सादरीकरण केले.

## • राज्यस्तरीय शिबिर : (हिवरे बाजार, जि.अहमदनगर)

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व न्यु आर्ट्स, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सलग तिसरे राज्यस्तरीय शिबिर हिवरे बाजार, जि. अहमदनगर येथे दि. २४ ते ३० सप्टेंबर २००६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मा.रामनाथजी वाघसाहेब (अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे उपाध्यक्ष) याचे हस्ते झाले. या शिबिरासाठी एकुण ३५० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. ३०/९/२००६ रोजी तिसऱ्या राज्यस्तरीय शिबिराचा समारोप समारंभ झाला. या समारोप प्रसंगी प्रा.श्रीमती निलुफर अहमद, राज्यसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन, डॉ. संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, डॉ. संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, रासेयो पुणे विद्यापीठ, श्री.एम.एस. जांभुळे, सहाय्यक कार्यक्रम सल्लागार भारत सरकार, प्रा. के.के. कनोजिया, टीओआरसी, अहमदनगर हे उपस्थित होते.

## • पदव्युत्तर विभाग रासेयो एककाचे उद्घाटन :

दि. २७/०९/२००६ पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाचे उद्घाटन झाले. या उद्घाटनप्रसंगी रासेयोचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संजय चाकणे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे, प्रा.तेज निवळीकर, पदव्युत्तर विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रभाकर घोडके उपस्थित होते.

## • प्रजासत्ताक दिन संचलनासाठी स्वयंसेवक निवड शिबिर :

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रजासत्ताक दिन संचलनासाठी स्वयंसेवक निवड शिबिर दि. ०८ सप्टेंबर २००६ रोजी घेण्यात आले या शिबिरासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयांतून ३५० स्वयंसेवकांमधून ५० स्वयंसेवकांची पुर्वसंचलन शिबिर सातारा व १२ स्वयंसेवकांची पुणे येथे होणाऱ्या पुर्व संचलनासाठी निवड करण्यात आली. १०० विद्यार्थ्यांची निवड रत्नागिरी येथील राज्यस्तरीय शिबिरासाठी करण्यात आली.

## • धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय शैक्षणिक परिषद : (दि. २४ सप्टेंबर २००६)

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथे धर्मनिरपेक्षता व सामाजिक न्याय शैक्षणिक परिषद यावर दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकुण ४०० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. त्याचबरोबर २० कार्यक्रम अधिकारी या शिबिरात सहभागी झाले. या शिबिराचा समारोप समारंभ पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.नरेंद्र जाधव यांनी केले.

## • पश्चिम विभागिय आंतरराज्यीय रासेयो विशेष शिबिर रत्नागिरी :

दि.२९ ऑक्टो. ते ०७ नोव्हें ०६ या कालावधीत रत्नागिरी येथे पश्चिम विभागिय आंतरराज्यीय रासेयो विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. 'निरोगी भारतासाठी निरोगी युवक व आपत्ती व्यवस्थापन' या संकल्पनेवर हे शिबिर आधारित होते. पुणे विद्यापीठ रासेया विभागातील ५२ स्वयंसेवकांचा संघ डॉ.संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, रासेयो पुणे विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनाखाली पाठविण्यात आला होता. या संघाचे प्रमुख प्रा. एम.डि. डोंगरे, अमृतेश्वर कला महाविद्यालय व प्रा.मधुकर नवगिरे, जिजामाता महाविद्यालय, भेंडा या कार्यक्रम अधिका–यांना पाठविण्यात आले होते. या शिबिरात ''उत्कृष्ट स्वयंसेवक व स्वयंसेविका'' हे दोन्ही पुरस्कार पुणे विद्यापीठाच्या श्री जहीर खान, जेजुरी महाविद्यालय, जेजुरी, व वृषाली पालकर या दोघांना मिळाले.

या शिबिरात पुणे विद्यापीठाच्या संघाने पथनाटय, लोकगिते, मुकअभिनय, समुहगान व इतर सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली त्याच बरोबर वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, लोकगीत स्पर्धा, पथनाटय स्पर्धा इत्यादीमध्ये प्राविण्य मिळविल्यामुळे उत्कृष्ट संघ म्हणूनही पुणे विद्यापीठ संघास गौरविण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापन, निरोगी भारतासाठी निरोगी युवक, एड्‌स जनजागृती, स्वच्छता मोहिम, व्यक्तिमत्व विकास, संस्कृतीचे आदान प्रदान, राष्ट्रीय एकात्मता, विविधतेतून एकता असे विविध कार्यक्रम या शिबिरात राबविण्यात आले.

- **जालना येथील राज्यस्तरीय गांधी विचार शिबिर :**

दि. ८ ते १२ नोव्हेंबर २००६ दरम्यान महात्मा गांधी अध्ययन केंद्र, जालना येथे राज्यस्तरीय गांधी विचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठाचे १० स्वयंसेवक पाठविण्यात आले.

- **प्रजासत्ताक पुर्व संचलन शिबिर :**

अभिनव विद्यालय, आंबेगांव, कात्रज येथे प्रजासत्ताक पुर्व संचलन शिबिर दि. २९ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २००६ आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी पुणे विद्यापीठात झालेल्या निवड चाचणीमधून पुणे विद्यापीठाचे (६ मुली व ६ मुले) १२ स्वयंसेवकांची निवड करण्यात आली.

- **प्रजासत्ताक पुर्व संचलन शिबिर :**

पुर्व संचलन प्रशिक्षण शिबिरासाठी दि. ६ ते १२ नोव्हेंबर २००६ **रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा** येथे पुणे विद्यापीठ, अहमदनगर, नाशिक आणि पुणे जिल्हयांतून ३६ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला आहे.

- **जागतिक आयुर्वेद परिषद :**

दि. ०५ ते १२ नोव्हेंबर २००६ या कालावधीत पुणे विद्यापीठ, पुणे येथे भरलेल्या दुस—या जागतिक आयुर्वेद परिषदेमध्ये ४०० स्वयंसेवक व १० प्राध्यापक स्वयंसेवक म्हणून काम केले.

- **आनंदवन (श्रमसंस्कार व व्यक्तीमत्व विकास शिबिर) :**

राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांच्या आदेशान्वये दि. १४ ते २३ नोव्हेंबर २००६ या दरम्यान आनंदवन येथे श्रमसंस्कार व व्यक्तीमत्व विकास शिबिर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्‌घाटन दि. १४ नोव्हेंबर २००६ रोजी मा.कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या आनंदवनच्या शिबिरासाठी पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयांतून एकूण ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

- **एड्‌ अवेरनेस रॅली :**

दि.१ डिसेंबर २००६ रोजी हरिभाई देसाई महाविद्यालयातर्फे एड्‌स अवेरनेस रॅली चे आयोजन करण्यात आले होते. या रॅली मध्ये पुणे शहरातील विविध महाविद्यालयांतील ३५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या रॅली मध्ये डॉ.संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना व डॉ.संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ यांनीही सहभाग घेतला.

- **तारूण्यभान सजग मागोवा कार्याशाळा :**

दि.८ ते १० डिसेंबर २००६ रोजी आबासाहेब गरवारे महाविद्यालय येथे महाराष्ट्र भूषण व मॅकआर्थर पुरस्कृत डॉ.राणी बंग आयोजित तारूण्यभान सजग मागोवा घेणारी ३ दिवसांच्या कार्यशाळेत ४४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेत प्रेमभावना व मैत्री, निरामय लैंगिक जीवन, स्वपरिचय शारिरीक व मानसिक, निकोप वैवाहिक जीवनाची पूर्वतयारी नातेसंबंध व सुसंवाद अशा अनेक विषयांची वैज्ञानिक पण सुलभ उहापोह द्वारे चर्चासत्रे, विविध खेळ, गाणी, नाच, स्लाइड शो, व्याख्याने, नाटयछटा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## • जेजुरी शिबिर : ( दि. १०/१२/२००६ ते १९/१२/२००६)

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरी गडावर राष्ट्रीय सेवा योजना आणि जेजुरी कला महाविद्यालया, जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने जेजुरी हिरवा गड या हा अभियानाचा उद्‌देश ठेवून या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरासाठी पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक या जिल्हयांतून एकूण ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या शिबिरादरम्यान जेजुरी गडावर ५०० मीटरचे सलग समपातळी चर खोदण्यात आले. त्याचप्रमाणे जेजुरी स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जनजागृती मोहिम इ. चे आयोजन शिबिरादरम्यान करण्यात आले.

## • राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरे :

राष्ट्रीय सेवा योजनेची विशेष शिबिरे पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक या जिल्हयांमधून खालीलप्रमाणे राबविण्यात आली. या विशेष शिबिरांचा 'सदृढ भारतासाठी सदृढ युवक' हा उद्‌देश ठेवण्यात आला.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | शिबिरे झालेली महाविद्यालयांची संख्या | शिबिरे न झालेली महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ५० | ०१ |
| २ | पुणे ग्रामीण | ३६ | ०० |
| ३ | अहमदनगर | ५७ | ०० |
| ४ | नाशिक | ५८ | ०१ |
| | एकूण | २०१ | ०२ |

## • गिर्यारोहण शिबिर :

राष्ट्रीय सेवा योजनेची आणि ॲड.एम.एन.देशमुख महाविद्यालय, राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ प्रतिनिधीसाठी गिर्यारोहण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक या जिल्हयांमधून एकूण ७५ विद्यापीठ प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

- **१२ वा राष्ट्रीय युवा महोत्सव (सूविचार) :**

१२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव दि. १२ ते जानेवारी २००७ या दरम्यान झाला. यामध्ये सूविचाराचा कार्यक्रम दि. १३ ते १५ जानेवारी २००७ या कालावधीत पुणे विद्यापीठाच्या परिसरात आयोजन करण्यात आले. यामध्ये मा.कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव, पुणे विद्यापीठ, पुणे, मा.डॉ.विजय भटकर, कु.शितल महाजन, श्री.संजीव अभ्यंकर अशा अनेक मान्यवरांची व्याख्याने या दरम्यान झाली. या सूविचाराच्या कार्यक्रमासाठी पुणे शहरातील १५ महाविद्यालयांमधून आणि पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातून एकूण ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

- **अजिंक्य देशपांडे यांस इंदिरा गांधी राष्ट्रीय युवा पुरस्कार :**

१२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव दि. १२ ते जानेवारी २००७ या दरम्यान झाला. या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये श्री.अजिंक्य देशपांडे याला राष्ट्रीय सेवा योजनेचा इंदिरा गांधी राष्ट्रीय युवा पुरस्कार उपराष्ट्रती भैरोसिंह शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

- **समर्थ भारत अभियान :**

राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांच्या आदेशान्वये महामहिम राष्ट्रपती यांच्या स्वप्नातील भारत समर्थ होण्यासाठी आणि खेडी स्वतः समर्थ होण्यासाठी समर्थ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली. समर्थ भारत अभियानाचा कृती आराखडा ठरविण्यासाठी वेळावेळी खालील प्रमाणे बैठका घेण्यात आल्या.

| **अ.क्र.** | **दिनांक** | **समर्थ भारत अभियान कार्यक्रम** |
|---|---|---|
| १ | २९/११/२००६ | कार्यकारी समितीची पहिला सभा : **रामदास सभागृह** |
| २ | ३०/११/२००६ | समर्थ भारत अभियानाची पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशनद्वारे सादरीकरण सभा |
| ३ | ३१/११/२००६ | समर्थ भारत अभियानाची पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशनद्वारे सादरीकरण सभा |

| | | |
|---|---|---|
| ४ | २०/१२/२००६ | मा.कुलगुरु, मा.कुलसचिव ,मा.संचालक, बी.सी.यु.डी., प्रा.एस.आय.पाटील व कार्यकारी समितीची संयुक्त सभा : **मा. कुलगुरु कार्यालय** |
| ५ | २१/१२/२००६ | समर्थ भारत अभियान सल्लागार समितीची सभा – **शिवाजी सभागृह** (एकूण ३५ सदस्य ) सकाळी १०.०० वाजता |
| ६ | २६/१२/२००६ | **नाशिक जिल्हा** संयुक्त सभा : प्राचार्य, रासेयो अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, विद्यापीठ प्रतिनिधी, रासेयो प्रतिनिधी, दुपारी २.०० वाजता |
| ७ | २६/१२/२००६ | **अहमदनगर जिल्हा** संयुक्त सभा : संगमनेर कॉलेज, प्राचार्य, रासेयो अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, विद्यापीठ प्रतिनिधी, रासेयो प्रतिनिधी, दुपारी ५.०० वाजता |
| ८ | २८/१२/२००६ | समर्थ भारत अभियान सभा : पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयातील मा.प्राचार्य आणि मा.संस्थाचालक दुपारी ३.३० वाजता – **पुणे विद्यापीठ** |
| ९ | २/०१/२००७ | **पुणे जिल्हा** संयुक्त सभा : व्ही.पी. कॉलेज, **बारामती** प्राचार्य, रासेयो अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, विद्यापीठ प्रतिनिधी, रासेयो प्रतिनिधी, दुपारी ३.०० वाजता |
| १० | ३/०१/२००७ | सकाळी १०.०० वाजता – पुणे विद्यापीठ विभागप्रमुख सभा – **पुणे विद्यापीठ** |
| ११ | ३/०१/२००७ | दुपारी १२.०० वाजता – प्राचार्य, विद्यार्थी , शिक्षकेतर संघटना, पदाधिकारी – **पुणे विद्यापीठ** |
| १२ | ३/०१/२००७ | **पुणे शहर** संयुक्त सभा : **ज्ञानेश्वर सभागृह, पुणे विद्यापीठ** प्राचार्य, रासेयो अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, विद्यापीठ प्रतिनिधी, रासेयो प्रतिनिधी, दु.५.०० वा. |
| १३ | ४/०१/२००७ | मा.कुलगुरु यांचे समवेत आढावा बैठक. |

- **( RD) प्रजासत्ताक दिन संचलन (दिल्ली) :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रजासत्ताक दिन संचलनासाठी पुणे विद्यापीठामधून दिल्ली येथे होणा–या प्रजासत्ताक दिनासाठी ३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांसाठी दि. १ जानेवारी ते ३१ जानेवारी २००७ दरम्यान दिल्ली येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

- **( SRD) प्रजासत्ताक दिन संचलन (मुंबई) :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रजासत्ताक दिन संचलनासाठी पुणे विद्यापीठामधून मुंबई येथे होणा–या प्रजासत्ताक दिनासाठी १६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ जानेवारी ते २६ जानेवारी २००७ दरम्यान मुंबई विद्यापीठ येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

- **शाश्वत विकास : काळाची गरज डॉ. राजेंद्र शेंडे यांचे व्याख्यान :**

पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी, पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या व कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांसाठी पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम समन्वयक डॉ.संजय चाकणे व पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे यांनी डॉ.राजेंद्र शेंडे यांचे ‘शाश्वत विकास’ या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या व्याख्यानासाठी २५० विद्यार्थी उपस्थित होते.

- **राज्यस्तरिय किशारावस्था प्रश्नमुंषा व एड्स कार्यशाळा :**

रासेया क्षेत्रिय कार्यालय, पुणे व पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दि. ८ फेब्रुवारी २००७ रोजी संत नामदेव सभागृह , पुणे विद्यापीठ, पुणे येथे राज्यस्तरिय किशोरावस्था प्रश्नमंजुषा व एक दिवसीय एड्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पुणे शहरातील विविध महाविद्यालयातील ३०० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.

प्रथम सत्रात पुणे विद्यापीठाच्या आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ.दिपक फाल्गुने यांचे एड्स या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. डॉ.दिपक फाल्गुने यांच्या व्याख्यानानंतर राज्यस्तरिय किशोरावस्था प्रश्नमंजुषेच्या उपात्य फेरीचे आयोजन करण्यात आले. उपांत्यफेरी  मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, जलगाव या संघांदरम्यान झाली. यावेळेस डॉ.एस.ए. इनामदान व प्रा.गणेश भामे यांनी Quiz-Master  म्हणून काम पाहिले.

दुपारी २.३० वा. राज्यस्तरिय किशोरावस्था प्रश्नमंजुषेचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी श्री.एम.एस. जांभुळे, सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, रासेयो, क्षेत्रिय कार्यालय, पुणे, प्रा.खलील अहमद, टी.ओ.आर.सी. मुंबई, प्रा.के.के. कन्होजिया, टी.ओ.सी. अहमदनगर, डॉ.संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ व डॉ. संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, रासेयो, पुणे विद्यापीठ हे उपस्थित होते. श्री.एम.एस. जांभुळे, डॉ.संभाजी पठारे, प्रा.खलील अहमद यांनी या वेळेस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उपांत्यफेरी मधून जळगांव, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, सातारा या संघांची निवड अंतिमफेरीसाठी करण्यात आली. अंतिमफेरी मध्ये General Round, Individual Round, Buzzer Round, Visual Round, Rapid Fire Round or 1 Minute Round या पाच Rounds चा समावेश करण्यात आला होता. अंतिमफेरीसाठी डॉ.संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, रासेयो, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी Quiz-Master  म्हणून काम पाहिले. यावेळी प्रा.खलील अहमद, टी.ओ.आर.सी. मुंबई, प्रा.के.के. कन्होजिया, टी.ओ.सी. अहमदनगर, डॉ.संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे हे परिक्षक म्हणून उपस्थित होत.

औरंगाबाद संघास राज्यस्तरिय किशोरावस्था प्रश्नमंजुषेचे प्रथम पारितोषिक मिळाले. कोल्हापूर संघास द्वितीय पारितोषिक व पुणे संघास तृतीय पारितोषिक मिळाले. मा.कुलगुरू पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या हस्ते सर्व विजेत्या संघास व सहभागी संघास पारितोषिक वितरण करण्यात आले. व त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- **हिरवा–पिवळा जेजूरीगड अभियान :**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व कला महाविद्यालय, जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ फेब्रु. ते १९ फेब्रु. २००७ दरम्यान जेजुरीच्या खंडोबा मंदिराच्या डोंगरावर 'हिरवा–पिवळा जेजुरी गड' अभियानांतर्गत १५०० झाडे लावून ठिबक सिंचन करण्यात आले. या शिबिरात पुणे, नगर, नाशिक जिल्हयातील २५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. डिसेंबरमध्ये खोदलेल्या चरांचे पुर्न:भरण व वृक्षारोपण आणि ठिबक सिंचन यावेळी करण्यात आले.

पेलट्रोफार्म, भेंडी, बेट्टी, बॉटलब्रश, जांभूळ, आंबा, बदाम, करंज इ. जातीची पिवळी फुले व दाट सावली देणा–या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

या शिबिराचे उद्‌घाटन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या नियामक मंडळाच्या सदस्य मा. शशिकला कोलते यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या म्हणाल्या की, 'उघडया जेजुरीगडाकडे पाहिल की मन खिन्न व्हायचं तेव्हा वाटायचं की, महाराष्ट्राचे कुलदैवत असलेला जेजुरीगड कधी हिरवागार दिसेल का? पण हे सर्वांचे स्वप्न कला महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पूर्ण करण्याचा ध्यास घेतला, याचा मनस्वी आनंद होत आहे'.

रविवार दि. १८/२/२००७ रोजी पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ.संजय चाकणे यांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या कार्यास सुरूवात झाली. मनोगतात ते म्हणाले,'पुणे विद्यापीठात नव्हे तर महाराष्ट्रात आदर्श ठरेल असे काम जेजुरी महाविद्यालयाने केले आहे. जेजुरीतील छोटया महाविद्यालयाने महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबा गडावर वृक्षारोपण व ठिबक संचन करून विद्यापीठातील सर्व महाविद्यालयांसमोर आदर्श निर्माण केला आहे'.

शिबिर कालावधीत पहाटे प्रार्थना व प्राणायाम ध्यान व योगासने घेतल्याने स्वयंसेवकांचे मानसीक व शाररिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत झाली.

या शिबिराची सांगता संस्थेचे सचिव मा.विजयरावजी कोलते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मार्गदर्शन करताना ते म्हणाले,'जेजुरीगडावरील या प्रकल्पाने हिरवा–पिवळा जेजुरीगड हे स्वप्न सत्यात येण्यास निश्चित मदत होईल व सा–या महाराष्ट्राने नोंद घेण्यासारखे अभियान राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून यशस्वीरित्या राबवून समाजात रचनात्मक बदल घडवू शकतो हे पुन्हा एकदा सिद्ध केले'.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे सहाय्यक कार्यक्रम सल्लागार मा.जांभुळे एम.एस. मनोगत करताना म्हणाले,'जेजुरी हे महाराष्ट्रातील शिबिराचे केंद्रच बनावे असे उत्कृष्ट काम जेजुरीगडावर झाले आहे. पण केलेले काम पूर्णत्वास नेण्यासाठी वृक्षांची संरक्षण करण्याची जबाबदारी ग्रामस्थ व विश्वस्तांवर आहे. असे त्यांनी नमूद केले'.

- **केंद्रीय पध्दतीने लेखे ( Central Audit ) :**

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २००६ – २००७ मध्ये पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्हयातील संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाद्वारा ज्या योजना उपक्रम राबविण्यात आल्या होत्या त्यांचे हिशेब गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी केंद्रीय पध्दतीने स्विकारण्यात आले.

लेखे स्विकारण्यासाठी आपल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे विभागनिहाय वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते.

| अ.नं. | दिनांक | वेळ | स्थळ | जिल्हा/विभाग | तालुका निहाय महाविद्यालये |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३ मार्च,२००७ | १० ते ५ | के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक | नाशिक | मालेगांव, निफाड, बागलाण, नांदगांव, कळवण, सुरगाणा, पेठ, दिंडोरी |
| २. | ४ मार्च,२००७ | ९ ते ३ | के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक | नाशिक | नाशिक शहर, सिन्नर, येवला, चांदवड, देवळा, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, दादरा नगर हवेल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | ७ मार्च,२००७ | ९ ते ६ | मुख्य इमारत, पुणे विद्यापीठ | पुणे शहर | पुणे शहर सर्व महाविद्यालये |
| ४. | ८ मार्च,२००७ | ९ ते ६ | मुख्य इमारत, पुणे विद्यापीठ | पुणे ग्रामिण | पुणे ग्रामिण विभागातील सर्व महाविद्यालये |
| ५. | १०मार्च,२००७ | १० ते ५ | अहमदनगर उपकेंद्र | अहमदनगर | श्रीरामपूर, संगमनेर, कर्जत, कोपरगांव, पाथर्डी, अकोले, शेवगांव, जामखेड |
| ६. | ११मार्च,२००७ | ९ ते ३ | अहमदनगर उपकेंद्र | अहमदनगर | अहमदनगर, नेवासा, राहता, पारनेर, राहूरी, श्रीगोंदा |

सदर केंद्रीय लेखा परीक्षणासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ व रासेयो विभागातील सेवकांव्यतिरिक्त विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागातील खालील सेवकांचे बहुमुल्य सहकार्य लाभले आहे.

केंद्रीय लेखा परीक्षणाचा पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील बहुतांश संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना लाभ झाला असून याद्वारे विद्यार्थी कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत चालू शैक्षणिक वर्षात मान्यता प्रदान केलेल्यापैकी सुमारे ९९ टक्के योजना / उपक्रमांचे लेखे तपासून संबंधितांना धनादेश अदा करण्यात आले आहेत. यामुळे वरील दोन्ही विभागांबरोबरच वित्त व लेखा विभागाचेही पुढील सुमारे ४ महिने लेखे तपासण्याचे काम अवघ्या ६ दिवसातच पुर्ण झाले आहे. पुणे विद्यापीठाच्या या केंद्रीय लेखा परीक्षणाच्या अभिनव उपक्रमाची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्राच्या ६ विद्यापीठांचे प्रतिनिधी अहमदनगर येथे दिनांक ११ मार्च २००७ रोजी आले होते. ही पध्दत वेळेची व श्रमाची तसेच पैशांचीही बचत करणारी असल्याने सदर पध्दतीचा आपआपल्या विद्यापीठांमध्ये अवलंब करण्याचा निश्चय त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## • रासेयो वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ :

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण मंडळ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि. २६ मार्च २००७ रोजी संत ज्ञानेश्वर सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे येथे झाला. मा.प्राचार्य, डॉ. मधुसूदन कौंडिण्य व मा. कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी मा.प्राचार्य, डॉ.मधुसूदन कौंडिण्य यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. व मा.कुलगुरू डॉ.नरेंद्र जाधव यांचे अध्यक्षिय भाषण झाले. पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक डॉ.संभाजी पठारे, संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ यांनी केले. डॉ.संजय चाकणे, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी सूत्रसंचालन केले.

जिल्हा स्तरीय पुरस्कार खालीलप्रमाणे :

१) पुणे शहर :

अ) सर्वोत्कृष्ट एकक महाविद्यालय : बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे.

ब) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. वैशाली बनसोड,**
बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे.

क) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **कु. शितल यादव,**
सेंट मिरा मुलींचे महाविद्यालय, पुणे

२) पुणे ग्रामीण :

अ) सर्वोत्कृष्ट एकक महाविद्यालय : कला व वाणिज्य महाविद्यालय, घोडेगांव,
ता. आंबेगाव, जि. पुणे.

ब) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. मोकाटे नाथा रामभाऊ**
कला व वाणिज्य महाविद्यालय, घोडेगांव,
ता. आंबेगाव, जि. पुणे.

क) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **श्री. भांगे रोहिदास चांगदेव**
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
इंदापूर, जि. पुणे.

३) अहमदनगर :

अ) सर्वोत्कृष्ट एकक महाविद्यालय : कला व वाणिज्य महाविद्यालय,
बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

ब) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. बी.एन. पवार**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

क) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **श्री. भगत गणेश लक्ष्मण**
न्यू आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
अहमदनगर.

४) नाशिक :

अ) सर्वोत्कृष्ट एकक महाविद्यालय : के.टी.एच.एम. महाविद्यालय,
शिवाजीनगर, गंगापूर रोड,
नाशिक.

ब) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. बी.जे. भंडारे**
के.टी.एच.एम. महाविद्यालय,
शिवाजीनगर, गंगापूर रोड,
नाशिक.

क) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **कु. गडाख स्मिता कचरू**
क.का. वाघ कला, वाणिज्य व विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय, चांदोरी,
ता. निफाड, जि. नाशिक

५) विद्यापीठस्तरीय पुरस्कार :

अ) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. बी.डी. माशेरे**
सी.के.गोयल महाविद्यालय,
दापोडी, जि. पुणे.

ब) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **श्री. विजय रविंद्र कवडे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
टाकळी खातगांव, ता.जि. अहमदनगर.

६) राज्यस्तरीय पुरस्कारासाठी शिफारस :

अ) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी : **प्रा. वाल्मिक नाना गिते**
ॲड.एम.एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर, जि.अहमदनगर.

ब) सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक : **कु पूजा गुणाजी साळवे**
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौंड रोड, पुणे.

- अजिंक्य देशपांडें यांची पाकीस्तान येथे जाणा—या संघात निवड
- डॉ.संजय चाकणे यांची राष्ट्रीय सेवा योजना **review** मार्गदर्शिका समितीवर निवड
- राष्ट्रीय सेवा योजना **"A Case study of Impact of National Service Scheme Activities on Volunteers, Programme officers & Community",'RGNYD'** या संस्थेकडे पाठविलेल्या १०,००,०००/— च्या प्रस्तावास मान्यता.
- राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था राजेंद्रनगर हैदराबाद येथे दि.७ ते १६ मे २००७ दरम्यान होणा—या **"Research Methodoloy for Rural Development Professionls"** या कार्यशाळेसाठी प्रा.राजकुमार रिकामे व डॉ.शाकिरा इनामदार यांची निवड.

कार्यक्रम समन्वक,
राष्ट्रीय सेवा योजना,
पुणे विद्यापीठ, पुणे